आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना माध्यमिक शालांत परीक्षोत्तर कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरासाठी देण्यात येणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती.

शिष्यवृत्ती संख्येत व दरात सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग,
शासन निर्णय,क्रमांक-एससीएच १०९५/[८६/९५]/माशि-८,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.

दिनांक:-१५ ऑक्टोबर,१९९६.

वाचा- १] शासन निर्णय शिक्षण व युवक सेवा विभाग क्र. इबीसी १४७८/२९२२३/३५, दिनांक २८. ८. १९७८.

२] शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एससीएच १०९३/[३७९/९३] माशि-८, दिनांक २. २. १९९४[अभ्यासगटाची नियुक्ती]

३] अभ्यासगटाच्या शिफारशी व शिफारशींना दि. २४. ७. १९९५ ला प्राप्त झालेली शासन मान्यता [ न. क्र. एससीएच १०९५/[१७८/९५]माशि-८,]

४] शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे क्र. शिष्यवृत्ती/१९९६-९७/२१ ई, दिनांक २०. १. १९९६ चे पत्र.

प्रस्तावना-

आर्थिकदृष्टया मागासवर्गातील हुशार मुलामुली ज्यांना माध्यमिक शालांत परीक्षेत शेकडा ४५ टक्के गुण मिळालेले आहेत व जे पहिल्याच वेळी उत्तीर्ण झाले आहेत अशांनी पुढील उच्च शिक्षणास वंचित राहू नये म्हणून शासनाने १९७८-७९ सालापासून शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्र. इबीसी १४७८/२९२२३/३५, दिनांक २८. ८. १९७८ अन्वये १६०० गुणवत्ता शिष्यवृत्त्या मंजूर केलेल्या आहेत. ही शिष्यवृत्ती फक्त कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरासाठीच उपलब्ध आहे. या शिष्यवृत्त्यांची विभागणी [१] १,००० शिष्यवृत्त्या शास्त्र शाखा, [२] ४०० शिष्यवृत्त्या वाणिज्य शाखा व [३] २०० शिष्यवृत्त्या कला शाखेमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी अशी करण्यात आलेली आहे. या शिष्यवृत्तीचे दर उच्च माध्यमिक अभ्यासक्रमाकरिता दरमहा रु. ७०/- मुलांकरिता व दरमहा रु. ८०/- मुलींकरिता, ते जर वसतिगृहात राहत असतील तर दिले जातात. तसेच वसतिगृहात न राहणा-या विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना हे दर अनुक्रमे रु. ४० व ५० असे आहेत.

३. शासन स्तरावरील शिष्यवृत्त्यांच्या संचात व दरात सुधारणा या अशासकीय ठरावावर दि. १७.१२.९३ रोजी विधान परिषदेत शासन स्तरावरुन दिल्या गेलेल्या आश्वासनांनुसार, दि. ३.२.९४ च्या शासन आदेशान्वये नियुक्त केलेल्या अभ्यासगटाने, या शिष्यवृत्तीबाबत केलेल्या खालील शिफारशी शासनाने दि. २४.७.९५ रोजी मान्य केल्या.

[अ] इ.बी.सी. योजनेनुसार, पालकाच्या वार्षिक उत्पन्नाची जी रु.१५.००० मर्यादा आहे, ती उत्पन्न मर्यादा या शिष्यवृत्तीबाबत रु.३०,००० वार्षिक करण्यात यावी.

[ब] शिष्यवृत्तीचे सध्याचे एकूण संच जे १६०० आहेत ते दुप्पट करुन ३२०० करण्यात यावेत.

[क] शिष्यवृत्तीचे सध्याचे दर दुप्पट करण्यात यावेत.

[ड] ४५ टक्के गुणाची अट ५० टक्के करण्यात यावी

शासन निर्णय-

आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थी व विद्यार्थिनींना कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षणासाठी उपलब्ध असणारे १६०० गुणवत्ता शिष्यवृत्ती संच [अ] १९९६-९७ मध्ये ५३० अतिरिक्त संच [ब] १९९७-९८ मध्ये ५३० अतिरिक्त संच आणि [क] १९९८-९९ मध्ये ५४० अतिरिक्त संच असे तीन वार्षिक टप्प्यांत गुणवत्ता शिष्यवृत्ती संच १६०० ने वाढवून दुप्पट संच म्हणजेच एकूण ३२०० गुणवत्ता शिष्यवृत्ती संच १९९८-९९ पासून करण्यास व त्याप्रित्यर्थ १९९६-९७ ते १९९९-२००० मध्ये टप्प्याटप्प्याने होणाऱ्या रु.५७.६० लक्ष [रुपये सत्तावन्न लक्ष आणि साठ हजार फक्त] खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. शिक्षण संचालकांनी या शिष्यवृत्त्यांची विभागणी +- २ स्तरावर विज्ञान शाखा, वाणिज्य शाखा व कला शाखा मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये पुढीलप्रमाणे करावी.

| कनिष्ठ महाविद्यालयीन शाखा. | सध्याचे संच | १९९६-९७ मधील संच | १९९७-९८. मधील संच | १९९८-९९ मधील संच |
|---|---|---|---|---|
| विज्ञान शाखा | १००० | १३३१ | १६६३ | २००० |
| वाणिज्य शाखा | ४०० | ५३२ | ६६५ | ८०० |
| कला शाखा | २०० | २६७ | ३३२ | ४०० |
| एकूण | १६०० | २१३० | २६६० | ३२०० |

२. न- २ स्तरावरील, दोन वर्षांसाठी, प्रत्येक गुणवत्ता शिष्यवृत्तीचे सध्याचे दर १९९६-९७ पासून खालीलप्रमाणे दुप्पट करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| | शिष्यवृत्तीचे द.म. दर [दरवर्षी फक्त १० महिन्यांसाठी] | | | |
|---|---|---|---|---|
| | वसतिगृहात रहाणारे विद्यार्थी रु. | वसतिगृहात रहाणाऱ्या विद्यार्थीनी रु. | वसतिगृहात न रहाणारे विद्यार्थी रु. | वसतिगृहात न रहाणाऱ्या विद्यार्थीनी रु. |
| सध्याचे दर | ७० | ८० | ४० | ५० |
| १९९६-९७ पासूनचे सुधारित दर. | १४० | १६० | ८० | १०० |

३. गुणवत्ता शिष्यवृत्तीचा कालावधी न- २ स्तरावरील फक्त दोन वर्षांसाठीच आह ही शिष्यवृत्ती वर्षातील फक्त १० महिन्यासाठीच अनुज्ञेय आहे.

४. प्रस्तावनेत निर्देशिलेली ४५ टक्के गुणांची अट ५० टक्के करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. इ. ११ वी मध्ये ५० टक्के गुण मिळवून पाहिल्याचवेळी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती पुढील शिक्षणासाठी फक्त इ. १२ वी मध्ये चालू राहील.

५. इ. बी. सी. योजनेनुसार पालकाच्या वार्षिक उत्पन्नाची जी रु. १५,०००/- मर्यादा आहे, ती उत्पन्न मर्यादा या गुणवत्ता शिष्यवृत्तीबाबत रु. ३०,०००/- वार्षिक करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

६. दि. २८. ८. ७८ च्या आदेशाला जोडलेल्या या योजनेसंबंधीत नियमावलीत सुधारणा करुन सुधारीत नियम शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनाच्या मान्यतेसाठी शासनास सादर करावेत.

७. या प्रित्यर्थ १९९७-९८, १९९८-९९ आणि १९९९-२००० मध्ये होणाऱ्या अनुक्रमे रु. १२.७२ लक्ष, रु. १२.८४ लक्ष व रु. ६.४८ लक्ष अतिरिक्त खर्चाची तरतूद त्या त्या वर्षासाठी करण्यासाठी शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास योग्यवेळी विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करावेत.

८. शिष्यवृत्ती दर वाढ व शिष्यवृत्ती संच वाढ यामुळे १९९६-९७ पासून होणारा वार्षिक रु. २५.५६ लक्ष अतिरिक्त खर्च "२२०२-सर्वसाधारण शिक्षण--८०-सर्वसाधारण १०७ शिष्यवृत्ती [सात][ए] आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती [ २२०२ १२५१] या अर्थशीर्षाखाली १९९६-९७ मध्ये केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.